Peer Reviewed Referred and UGC Listed Journal (Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - I January - March - 2019

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या - आधुनिकीकरणात शिक्षणाची भूमिका<br>**प्रा. लबडे ए. बी.** | ६५-६८ |
| १४ | महाराष्ट्राच्या आधुनिकीकरणातील सहकारी चळवळीचे योगदान : शोध आणि बोध<br>**प्रा. निळे सुधाकर विष्णु** | ६९-७३ |
| १५ | नवमहाराष्ट्रातील मराठीची शैक्षणिक वाटचाल : प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या दृष्टीकोनातून<br>**प्रा. मनोज उत्तमराव पाटील** | ७४-७६ |
| १६ | एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राचे - आधुनिकीकरण एक दृष्टीक्षेप<br>**प्रा. राजभोज संदिप बाबासाहेब** | ७७-८० |
| १७ | बाबा पद्मनजी : एक सामाजिक साहित्यकार<br>**डॉ. गणेश काशिनाथ होनराव** | ८१-८४ |
| १८ | ब्रिटीशकालीन जमीनमहसूल सावकारी व जमीनदारी व्यवस्थेला उपकारक<br>**भामे गणेश पंढरीनाथ** | ८५-८७ |
| १९ | आधुनिकीकरण आणि महाराष्ट्रातील स्त्रीवादी दृष्टीकोण<br>**सय्यद चांद पटेल झुंबर** | ८८-९० |
| २० | १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्राचे आधुनिकीकरण एक आढावा<br>**प्रा. भोसले राजेसाहेब गंगाधरराव** | ९१-९५ |
| २१ | एकोणिसाव्या शतकामधील महाराष्ट्रातील कामगार चळवळ<br>**श्री. विलास आत्माराम देऊलकर** | ९६-९९ |
| २२ | स्त्रियांच्या संदर्भात आधुनिकीभवन व विकास<br>**प्रा. डॉ. सुवर्णा गुडगे - बेनके** | १००-१०९ |
| २३ | महाराष्ट्रातील आधुनिक करणात वृत्त पत्राची भुमिका<br>**प्रा. डॉ. संभाजी सोपानराव दराडे** | ११०-११२ |
| २४ | महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा चळवळीतील डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचे योगदान<br>**प्रा. शिरसाठ संदिप हरिभाऊ** | ११३-११६ |
| २५ | भारतीय कामगार चळवळीचे जनक रावबहादुर नारायण मेघाजी लोखंडे<br>**डॉ. विनोद बा. बोरसे** | ११७-१२० |

# २३. महाराष्ट्रातील आधुनिक करणात वृत्त पत्राची भुमिका

**प्रा. डॉ. संभाजी सोपानराव दराडे**
सहाय्यक प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर.

**प्रस्तावना**

आजच्या कालखंडात माहिती प्रसारक माध्यमांना लोकशाहीचा तिसरा डोळा म्हणुन ओळखले जाते. प्रसारमाध्यमात महत्वाची भुमिका बजावते ते म्हणजे वृत्तपत्रे. ब्रिटिश भारतात आले त्यांनी व्यापार करताना या ठिकाणी सत्ता प्रस्थापीत केली व हळु-हळु भारतात सुधारणा घडवुन आणण्यास सुरुवात केली. त्यामध्ये प्रामुख्याने औदयोगिक सुधारणा असतील, शैक्षणिक सुधारणा असतील, त्याचबरोबर रेल्वेचा विकास, तारायंत्रे या सुधारणा असतील. अशीच एक महत्वाची सुधारणा म्हणजे भारतात वृत्तपत्राची केलेली सुरुवात. भारतात सर्वप्रथम वृत्तपत्र जेम्स हिकी याने बेगॉल गॅझेट हे सुरु केले. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात वृत्तपत्राची सुरुवात बाळशास्त्री जांभेकरांनी केली. म्हणून मराठी वृत्तपचाचा जनक म्हटले जाते. महाराष्ट्रात एकोणिसाव्या शतकात दर्पण, दिग्दर्शन, सुधारक, काळ, ज्ञानोदय, केसरी, मराटा यासारखे विविध वृत्तपत्रे होती की ज्यांनी महाराष्ट्रात प्रबोधन घडवुन आणण्यास ब्रिटिशांच्या अन्यायकारी प्रशासनावर टिका करण्यास महत्वाची भुमिका बजावली.

**उद्‌दिष्टे**

1. एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील वृत्तपत्राचा अभ्यास करणे.
2. महाराष्ट्राच्या आधुनिकीकरणात वृत्तपचाची भुमिका अभ्यासणे.
3. महाराष्ट्रातील विविध वृत्तपत्राचा आढावा घेणे.
4. प्रबोधन चळवळीतील वृत्तपत्राचे योगदान अभ्यासने.

**संशोधन पद्धती**

सदर शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करुन त्यामध्ये प्राथमिक व दुय्यम साधनाचा वापर केला आहे. त्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, शोधनिंबध, इ. साधनांचा वापर केला आहे.

**विषय मर्यादा**

शोधनिंबधनासाठीचा विषय हा केवळ 19 व्या शतकातील व महाराष्ट्रातील वृत्तपत्रा पुरताच मर्यादित आहे.

**महाराष्ट्रातील विविध वृत्तपत्रे**

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात विविध वृत्तपत्रे उदयाला आली. ज्याचे योगदान महाराष्ट्राच्या विकासात महत्वाचे आहे. ज्यांच्यामुळे प्रबोधनाच्या चळवळीला चालना मिळाली. क्रांतीकारकाच्या चहवळीला चालना मिळाली.

**1. दर्पण**

महाराष्ट्रात मराठी भाषेतुन सर्वप्रथम वृत्तपत्राची सुरुवात बाळशास्त्री जांभेकर यांनी 6 जानेवारी 1932 रोजी दर्पण च्या पहिल्या अंकाने केली. समाजाला जगात घडत असलेल्या गोष्टीची माहिती व सध्य परिस्थीतीचा कल्पना यावी यासाठी या वृत्तपत्राची सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात हे वृत्तपत्र मासिक होते नंतर ते साप्ताहिक झाले. त्यानंतर 1940 साली ते बंद पडले.

**2. दिग्दर्शन**

दिग्दर्शन या वृत्तपत्राची सुरुवात बाळशास्त्री जांभेकर यांनी 1940 साली केली. दिग्दर्शन हे मराठी भाषेतील पहिले मासिक होते. त्या वृत्तपचाचा सुरु करण्यामागचा मुख्य उद्देश भौतिक शास्त्राचा प्रसार करणे हा होता.

**3. प्रभाकर**

एक निर्भिड संपादक व पत्रकार असणा-या भाऊ महाजन यांनी पाश्चात्य शिक्षणाच्या प्रसारासाठी 1940 साली प्रभाकर या साप्ताहिकाची सुरुवात केली. याच साप्ताहिकामधुन भाऊ महाजन यांनी लोकहितवादीची शतपत्रे प्रसिद्ध केली. भाऊ महाजन यांना या वृत्तपत्रातुन स्वधर्म, स्वभाषा, स्वत ची संस्कृतीचा प्रसार करण्याचे काम केले.

**4. ज्ञानोदय**

इ.स. 141 साली ख्रिस्ती धर्माच्या प्रसारासाठी हेन्री बॅलटाईन यांनी अहमदनगर येथे या वृत्तपत्राची सुरुवात केली. हिंदु धर्मातील अनिष्ठ रुंढी-परंपरा प्रथा या विषयी दोष दाखविण्याचे महत्वाचे काम या वृत्तपत्राने केले.

**5. ज्ञानप्रकाश**

कृष्णाजी रानडे यांनी ज्ञानप्रकाश या साप्ताहिकाची सुरुवात हि 1849 मध्ये केली. ज्ञानाचा संग्रह करणे, ज्ञानाचा प्रसार करणे हे या वृत्तपत्राचे महत्वाचे उद्दिष्टे होते. नंतरच्या काळात 1904 साली हे दैनिक बनले. समाजाच्या अनिष्ठ रुढीवर प्रकाश टाकण्याचे महत्वाचे काम या वृत्तपत्राने केले.

**6. इतर वृत्तपत्रे**

वरील वृत्तपत्राव्यतिरिक्त 1862 साली विष्णुशास्त्री पंडीत यांनी इंदुप्रकाश, काशिनाथ विष्णु फडके यांनी 1866 मध्ये अरुणोदय वृत्तपत्राची सुरुवात केली. विश्वानाथ नारायण मंडलीक यांनी नेटिव्ह ओपेनियन, 01 जानेवारी 1977 रोजी कृष्णराव भालेकर यांनी दिनबंधु वृत्तपत्राची सुरुवात केली. तर 1881 रोजी लोकमान्य टिळकांनी केसरी व मराठा तर 1888 मध्ये गोपाळ गणेश आगरकरांनी सुधारक वृत्तपत्राची सुरुवात केली. तर 1842 रोजी ख्रिश्चन धर्माच्या प्रसारासाठी वीरेश्वर छत्रे यांनी ज्ञानसिंधु वृत्तपत्राची सुरुवात केली.

**वृत्तपत्राचे कार्य**

ब्रिटिश भारतात आले यावेळची परिस्थिती पाहता महाराष्ट्रात अनेक प्रकारच्या अनिष्ठ रुढी परंपरा, चालरीती मोठया प्रमाणात होत्या. यावर टिका करण्याचे समाजात यांच्याविषयी जागृती घडवुन आणण्याचे म्हणजेच सामाजिक सुधारणचे महत्वाचे कार्य वृत्तपत्राने केले. समाजामध्ये प्रबोधनाची चळवळ तळागाळा पर्यत पोहचविण्यात, सर्वसामान्याना जगाची ओळख करुन देण्याचे कार्य वृत्तपत्रानी केले. महाराष्ट्रात आधुनिक शिक्षणाचा खरा प्रसार हा वृत्तपत्राच्या माध्यमातुनच झाला. बाळशास्त्री जांभेकरांनी आपल्या दर्पण या

वृत्तपत्रातुन वेळोवळी शिक्षण संबधी लेख लिहुन शिक्षणाचे महत्व पटवून देण्याचे काम केले. प्रभाकर मधून जनतेला शिक्षणाचे महत्व पटवून देऊन एक ज्ञान संपन्न असा समाज घडविण्याचे कार्य केले.

आगरकरांनी सुधारक या वृत्तपत्रातुन समाजाच्या सुधारणे संबंधी विचार मांडले ना कृष्णाजी [illegible] ज्ञानप्रकाश व वृत्तपत्रात समाजप्रबोधन पर अनेक लेख लिहले. ज्ञानोदय सारख्या ख्रिश्चन मिशन त्याच्या चालीरीती महाराष्ट्रीयन धर्म रूढी परंपरा, अंधश्रद्धा चालीरीती यांच्यावर टिका करुन आपला धर्मप्रसार करण्याचे कार्य केले. त्याचप्रमाणे भारतात, महाराष्ट्रात राष्ट्रीय संस्कृती रुजविण्याचे कार्य या वृत्तपत्रांनी केले. क्रांतीकारकांना क्रांतीकारी कारवाचा करण्याची प्रेरणा याच वृत्तपत्रांनी दिली. या ब्रिटिशांच्या साम्राजवादी, आर्थिक शोषणाची उघडपणे चर्चा करण्याचे महत्वाचे कार्य याच वृत्तपत्रानी केले.

**निष्कर्ष**

एकोणीसाव्या शतकातील महाराष्ट्राचा विचार केल्यास असे दिसुन येते की या कालखंडात अनेक वृत्तपत्राचा उदय झालेला होता. नंतरच्या काळात याच वृत्तपत्राची समाजात शिक्षण, रुढी, परंपरा, याविषयी जागृती घडवुन आणण्याचे महत्वाचे कार्य केले. 19 व्या शतकात प्रबोधनाची जी चळवळ सुरु झाली ती ख-या अर्थाने वृत्तप्रत्राच्याच मुळे झाली. महाराष्ट्रामध्ये बाळशास्त्री जांभेकरांनी वृत्तपत्राची सुरुवात करुन महाराष्ट्राच्या आधुनिकरणाचा पाया घातला. मराठीत वृत्तापत्राचा जनक असे म्हणतात. 6 जानेवारी दर्पणच्या पहिल्या आवृतीचा दिवस आज ही पत्रकार दिवस म्हणुन साजरा केला जातो.

**संदर्भ साधने**

1. आधुनिक भारतचा इतिहास - बी.एल. ग्रोवर, एन.के. बेल्हेकर
2. आधुनिक महराष्ट्राचा इतिहास - डॉ. अनिल कठारे
3. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास - एस.एस. गाठाळ
4. आधुनिक भारत का इतिहास - माणिकलाल गुप्ता.